नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १५९ | Issue - 159 | वार शुक्रवार दि. २५ ऑक्टोबर २०२४ | Blow- Friday Date 25 October 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# घड्याळ चिन्ह वापरताना 'न्यायप्रविष्ठ' उल्लेख नाही; सूचनांचे पालन करा अन्यथा...

## सुप्रीम कोर्टाची अजित पवार गटाला तंबी; अजित पवार गटाला नव्याने प्रतिज्ञापत्र सादर करण्याच्या सूचना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान अजित पवार गटाकडून घड्याळ चिन्हासंदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचा उल्लेख केला जात नसल्याने शरद पवार गटाकडून सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात आली आहे. त्यामुळे निवडणुकीच्या तोंडावरच आता न्यायालयाने दोन्ही गटांना खडसावले आहे. आम्ही दिलेल्या सूचनांचे पालन करा, अन्यथा आम्ही स्वत:हून अवमान ठपका ठेवू असा इशाराच न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे दोन्ही गटाला निवडणुकीदरम्यान सावध पाऊलं टाकावी लागणार आहेत.



मात्र अजित पवार गटाने आपण सर्व सूचनांचे पालन करत असल्याचे प्रतिज्ञापत्र आणि पुरावे सादर करू असे आश्वासन न्यायालयात दिले आहे. तर शरद पवार गटाकडून तक्रार करण्यात आली होती. याची दखल घेत न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला नव्याने प्रतिज्ञापत्र सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शरद पवार गटाचे वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना म्हटले की, घड्याळ हे चिन्ह दोघांपैकी कोणालाही मिळू नये अशी आमची मागणी होती. मात्र तुम्ही १९ मार्च रोजी हे चिन्ह बहाल करताना काही अटी घातल्या होत्या. त्या अटींचे पालन अजित पवार गटाकडून केले जात नाही. तसेच शरद पवार यांच्या नावाचाही वापर होऊ नये असा आदेश होता. मात्र, घड्याळ हे चिन्ह अजूनही शरद पवार या नावाशी जोडले गेले आहे, याकडे मनु सिंघवी यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले.

तर अभिषेक मनु सिंघवीं यांनी पुढे म्हटले की, जे चिन्ह कोर्टाच्या विचाराधीन आहे तेव्हा त्याचा फायदा दोघांपैकी एकाला व्हायला नको, हे चिन्ह पक्ष फुटीपूर्वीचे आहे. या निरीक्षणांच्या आधारेच न्यायालयाने चिन्हाचा वापर करताना प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे सर्वत्र लिहिण्यात यावे, असे आदेश दिले होते. मात्र त्याचे पालन होत नाही. यावेळी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींकडून अजित पवारांच्या वकीलांना विचारणा करण्यात आली. तुम्ही नियमांचे पालन करत नाही का? असा खडा सवाल न्यायालयाने विचारला. यावर आम्ही नियमानुसार चिन्ह वापरत आहोत असे अजित पवार गटाचे वकील बलवीर सिंग यांच्याकडून सांगण्यात आले. तर सगळे फोटो शरद पवार पक्षाकडून दाखवले जात नाहीत, असा दावा सुद्धा बलबीर सिंग यांनी केला.

दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने घड्याळ चिन्हाच्या या वादावरुन दोन्ही गटाला खडसावले आहे. न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करा, नाहीतर आम्ही अवमानाचा ठपका ठेवू, असा इशारा न्यायालयाने दिला आहे. तुम्ही दोघांनी तुम्हाला दिलेले निर्देश पाळले पाहिजेत. जर मुद्दाम निर्देशांचे उल्लंघन कोणी केलं तर आम्ही स्वत:हून अवमान ठपका ठेवू, असेही न्यायालय म्हणाले. यानंतर अजित पवार गटाकडून त्वरित 'आम्ही स्वत:हून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन केल्याचे प्रतिज्ञापत्र आणि पुरावे सादर करू,' असे आश्वासन देण्यात आले.

# दोन लाखाची लाच स्वीकारण्याची तयारी दर्शवणाऱ्या पोलीस हवालदारविरुद्ध गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) गुन्ह्यात अटक केलेल्या मुलास गुन्ह्याच्या तपासात मदत करुन गुन्ह्यातून लवकरात लवकर जामीन करण्यासाठी तसेच गुन्ह्याच्या पुढील तपासात आणखी आरोपीच्या संख्यामध्ये वाढ न करण्यासाठी पोलीस हवालदार सचिन जाधवर यांनी स्वत:साठी व वरिष्ठांना देण्यासाठी म्हणून पुन्हा तक्रारदार यांचेकडे ५ लाख रुपयांची मागणी करुन तडजोडीअंती २,००,००० रुपये लाच रक्कम स्वीकारण्याची तयार दर्शविल्याचे पडताळणी कारवाईमध्ये निष्पन्न झाल्याने, पोलीस हवालदार सचिन जाधवर यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलाय.

कामती पोलीस ठाण्यास नेमणुकीस असलेले पोलीस हवालदार सचिन जाधवर यांच्याकडे तपासाधीन गुन्ह्यात अटकेत असलेल्या तक्रारदार याच्या मुलास गुन्ह्यात जामीन मिळावा तसेच त्या गुन्ह्यात आरोपीची संख्या न वाढविण्यासाठी तक्रारदाराकडे ५,००,००० रुपयांच्या लाचेची मागणी करुन तडाजोडीअंती २,००,००० रुपये मागणी करुन ती स्विकारण्यास संमती दिल्याचे पडताळणीत निष्पन्न झाल्याने पोलीस हवालदार यांच्याविरुद्ध कामती पोलिसांकडे गुन्हा दाखल करण्यात आलाय.

भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७, ७ अ प्रमाणे सचिन जाधवर, पोलीस हवालदार (वर्ग-३) यांच्याविरूध्द अयोग्यरित्या बेकायदेशीर परितोषण स्वीकारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी त्यांच्याविरुध्द कामती पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचं लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर विभागाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये सांगितलंय.

मार्गदर्शन अधिकारी शिरीष सरदेशपांडे (पोलीस अधीक्षक ला.प्र.वि., पुणे), डॉ. शीतल जानवे/खराडे (अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., पुणे) होते तर सापळा पथकातील पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार, पोह सलीम मुल्ला, पोशि राजु पवार, चापोशि शाम सुरवसे (सर्व नेमणुक अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर) यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

# अखेर काँग्रेसने पहिली यादी जाहीर, एकूण ४८ मतदारसंघातील उमेदवार केले जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभा निवडणुकीसाठी अखेर काँग्रेस पक्षाने आपली ४८ जणांची पहिली यादी जाहीर केली. महाविकास आघाडीमधील शिवसेना उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने त्यांची यादी जाहीर केल्यानंतर अखेर आज सर्वात शेवटी काँग्रेसने पहिली यादी जाहीर केली. विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या प्रमुख पक्षांपैकी सर्वात उशीरा काँग्रेस पक्षाने यादी जाहीर केली आहे.

महाविकास आघाडीतील जागा वाटपाची चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. अखेर काल काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाने पत्रकार परिषद घेऊन तिन्ही पक्ष प्रत्येकी ८५ जागा लढणार असल्याचे जाहीर केले. तर उर्वरीत जागांवर अद्याप चर्चा सुरू असल्याचे सांगण्यात आले होते. या पत्रकार परिषदेनंतर शिवसेनेने पहिली यादी जाहीर केली होती. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने थोड्यावेळापूर्वी पहिली यादी जाहीर केली होती. त्यानंतर सर्वांना प्रतिक्षा होती ती काँग्रेसच्या यादीची होय.



काँग्रेसची ४८ जणांची यादी- मतदारसंघ आणि उमेदवार

अक्कलकुआ - के.सी पाडवी, शाहादा - राजेंद्रकुमार गावीता, नंदुरबार - किरण तडवी, नवापूर - श्रीकृष्णकुमार नाईक, साकरी - प्रवीण चौरे, धुळे ग्रामीण - कुणाल पाटील, रावेर - धनंजय चौधरी, मलकापूर - राजेश एकाडे, चिखली - राहुल बोंद्रे, रिसोड - अमित झनक, धामणगाव रेल्वे - वीरेंद्र जगताप, अमरावती - सुनील देशमुख, तिवसा - यशोमती ठाकूर, अचलपूर - अनिरुद्ध देशमुख, देवळी - रणजीत कांबळे, नागपूर दक्षिण पश्चिम - प्रफुल्ल गुडधे, नागपूर मध्य - बंटी शेळके, नागपूर पश्चिम - विकास ठाकरे, नागपूर उत्तर - नितीन राऊत, साकोली - नाना पटोले, गोंदिया - गोपाळदास अग्रवाल, राजूरा - सुभाष धोटे, ब्रह्मपुरी - विजय वडेट्टीवार, चिमूर - सतीश वारजूकर, हदगाव- माधवराव पवार पाटील, भोकर- तिरुपती कदम कोंडेकर, नायगाव- मीनल पाटील खतगावकर, पाथरी- सुरेश वडपूरकर, फुलंब्री- विलास औताडे, मीरा भाईंदर- मुझफ्फर हुसेन, मालाड पश्चिम- अस्लम शेख, चांदिवली- आरीफ नसीम खान, धारावी- ज्योती गायकवाड, मुंबादेवी- अमीन पटेल, पुरंदर- संजय जगताप, भोर- संग्राम थोपटे, कसबा पेठ- रविंद्र धंगेकर, संगमनेर- बाळासाहेब थोरात, शिर्डी- प्रभावती घोगरे, लातूर ग्रामीण- धीरज देशमुख, लातूर शहर- अमित देशमुख, अक्कलकोट- सिद्धराम म्हेत्रे, कराड दक्षिण- पृथ्वीराज चव्हाण, कोल्हापूर दक्षिण- ऋतुराज पाटील, करवीर- राहुल पाटील, हातकणंगले- राजू आवळे, पळूस कडेगाव- विश्वजीत कदम, जत- विक्रमसिंह सावंत

# संजीव खन्ना यांची भारताचे सरन्यायाधीश म्हणून निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारताचे ५१ वे सरन्यायाधीश म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश सजीव खन्ना यांची निवड करण्यात आली आहे. केंद्रीय विधी व न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी ही घोषणा थोड्यावेळापूर्वी केली. मावळते सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी मागच्या आठवड्यातच संजीव खन्ना यांचे नाव सुचविले होते. त्यानंतर आता राष्ट्रपतींनी खन्ना यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले असून ११ नोव्हेंबर रोजी ते सरन्यायाधीश पदाची शपथ घेतील. चंद्रचूड यांच्यानंतर संजीव खन्ना हे सर्वात वरिष्ठ न्यायाधीश आहेत. त्यांच्या काळात त्यांनी काही ऐतिहासिक आणि महत्त्वाचे निकाल घेतले आहेत.



मावळते सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी मागच्या आठवड्यातच संजीव खन्ना यांचे नाव सुचविले होते. त्यानंतर आता राष्ट्रपतींनी खन्ना यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले असून ११ नोव्हेंबर रोजी ते सरन्यायाधीश पदाची शपथ घेतील. याच दिवशी विद्यमान सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड यांचा कालावधी संपत आहे.

संजीव खन्ना यांचा जन्म १४ मे १९६० रोजी झाला असून सुमारे चार दशकाहून अधिक काळ ते न्यायिक क्षेत्रात काम करत आहेत. १९८३ साली दिल्ली बार कौन्सिलचे सदस्य झाल्यानंतर त्यांनी जिल्हा न्यायालय तीस हजारी कोर्ट नंतर दिल्ली उच्च न्यायालय आणि विविध लवादांमध्ये वकिली केली. घटनात्मक कायदा, कर आकारणी, विविध लवाद, व्यावसायिक कायदे, कंपनी कायदे आणि पर्यावरण कायदे यासारख्या कायद्याच्या अनेक क्षेत्रात त्यांनी यशस्वीरित्या वकिली केली.

न्यायमूर्ती खन्ना यांनी प्राप्तिकर विभागासाठी वरिष्ठ वकील म्हणून काम केले आणि २००४ मध्ये दिल्लीच्या एनसीटी (सिव्हिल) विभागासाठीही वकिली केली. दिल्ली उच्च न्यायालयात काही गुन्हेगारी प्रकरणांमध्ये त्यांनी अतिरिक्त सरकारी वकील म्हणूनही भूमिका बजावली.

२००५ साली त्यांनी दिल्ली उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून काम करण्यास सुरुवात केल्यानंतर ते २००६ साली न्यायमूर्ती म्हणून कायम झाले. १८ जानेवारी २०१९ रोजी त्यांची सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून निवड झाली. न्या. संजीव खन्ना हे सध्या राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून काम करत आहेत. तसेच राष्ट्रीय न्यायिक अकादमी, भोपाळच्या गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य आहेत. जून ते डिसेंबर २०२३ या काळात त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या विधी सेवा समितीचे अध्यक्षपदही भूषविले होते.

## बारामतीत अखेर पुन्हा काका पुतण्याचीच लढत अटळ! अजित पवारांविरुद्ध लढणार युगेंद्र पवार

# शरद पवारांच्या पक्षाकडून पहिली उमेदवार यादी जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आमदार रोहित पवार, अनिल देशमुख, राजेश टोपे, बाळासाहेब पाटील, जितेंद्र आव्हाड या नेत्यांना पक्षानं पुन्हा एकदा संधी दिली आहे. तर उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या बारामती मतदारसंघातून युगेंद्र पवारांना तिकीट देण्यात आलेलं आहे. त्यामुळे बारामतीत यंदा काका विरुद्ध पुतण्या असा थेट सामना पाहायला मिळेल. लोकसभा निवडणुकीत बारामतीमध्ये अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा पराभव झालेला आहे. त्यानंतर आता शरद पवारांनी पुतण्याविरोधात नातू युगेंद्र पवारांना संधी दिली आहे.

गेल्या वर्षी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी फूट पडली. अजित पवारांच्या नेतृत्त्वात जवळपास ४० आमदारांनी शरद पवारांची साथ सोडली. अनेक मातब्बर नेते शरद पवारांना सोडून अजित पवारांसोबत गेले. अगदी मोजकेच आमदार शरद पवारांसोबत राहिले. त्यातील जवळपास सगळ्याच आमदारांना शरद पवारांनी पुन्हा तिकीट दिलं आहे. काही दिवसांपूर्वी भाजप सोडून आलेल्या हर्षवर्धन पाटील यांना इंदापुरातून, तर समरजीत घाटगे यांना कागलमधून उमेदवारी देण्यात आलेली आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी शरद पवारांचे उमेदवार कोण कोण?

इस्लामपूर- जयंत पाटील, काटोल- अनिल देशमुख. घनसावंगी- राजेश टोपे. कराड उत्तर- बाळासाहेब पाटील. कळबा मुंब्रा- जितेंद्र आव्हाड, कोरेगाव- शशिकांत शिंदे, वसमत- जयप्रकाश दांडेगावकर, जळगाव ग्रामीण- गुलाबराव देवकर, इंदापूर- हर्षवर्धन पाटील, राहुरी- प्राजक्त तनपुरे, शिरुर- अशोकराव पवार, शिराळा- मानसिंगराव नाईक, विक्रमगड- सुनील भुसारा, कर्जत जामखेड- रोहित पवार, अहमदपूर- विनायकराव पाटील, सिंदखेडराजा- राजेंद्र शिंगणे, उदगीर- सुधाकर भालेराव, भोकरदन- चंद्रकांत दानवे, तुमसर- चरण वाघमारे, किनवट- प्रदीप नाईक, जिंतूर- विजय भांबळे, केज- पृथ्वीराज साठे, बेलापूर- संदीप नाईक, वडगाव शेरी- बापूसाहेब पठारे, जामनेर- दिलीप खोडपे, मुक्ताईनगर- रोहिणी खडसे, मुर्तिजापूर- सम्राट डोंगरदिवे, तिरोडा- रविकांत बोपछे, अहेरी- भाग्यश्री अत्राम, बदनापूर- बबलू चौधरी, मुरबाड- सुभाष पवार, घाटकोपर पूर्व- राखी जाधव, आंबेगाव- देवदत्त निकम, बारामती- युगेंद्र पवार, कोपरगाव- संदीप वर्पे, शेवगाव- प्रताप ढाकणे, पारनेर- राणी लंके, आष्टी- मेहबूब शेख, करमाळा- नारायण पाटील, सोलापूर शहर उत्तर - महेश कोठे, चिपळूण- प्रशांत यादव, कागल- समरजीत घाटगे, तासगाव कवठेमहाकाळ- रोहित आर आर पाटील, हडपसर-प्रशांत जगताप



# बनावट वैद्यकीय दाखल्याद्वारे फसवणूक; तिघांवर गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) बनावट सही शिक्का असलेला वैद्यकीय दाखल्याद्वारे फसवणूक केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २२ जुन २०२२ ते ६ एप्रिल २०२४ दरम्यान राज्य परिवहन महामंडळ सोलापूर येथे घडली. याप्रकरणी अमोल चंद्रकांत गोंजारी (वय-४९,व्यवसाय : राज्य परिवहन महामंडळ सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अशोक मधुकर साळुंखे,चंद्रकांत शिवाजी रणदिवे (अकलूज आगार) व संगीता सूर्यभान घाडगे (बार्शी आगार) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.




याबाबत अधिक माहिती अशी की,वरील संशयित आरोपी यांनी वरील कालावधीमध्ये राज्य परिवहन महामंडळ सोलापूर विभाग येथे गैरहजर कालावधीतून कर्तव्यावर हजर होण्याकरिता मा.अध्यक्षस्थानी वैद्यकीय मंडळ श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर यांची बनावट सही शिक्का असलेला बनावट वैद्यकीय दाखला राज्य परिवहन महामंडळ कार्यालयास खरा असल्याचे भासवून कार्यालयामध्ये सादर करून शासनाची व राज्य परिवहन महामंडळाची फसवणूक केली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील हे करीत आहेत.

## संपादकीय....

# दोन्ही गटांना तंबी

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान अजित पवार गटाकडून घड्याळ चिन्हासंदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचा उल्लेख केला जात नसल्याने शरद पवार गटाकडून सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात आली आहे. त्यामुळे निवडणुकीच्या तोंडावरच आता न्यायालयाने दोन्ही गटांना खडसावले आहे. आम्ही दिलेल्या सूचनांचे पालन करा, अन्यथा आम्ही स्वतःहून अवमान ठपका ठेवू असा इशाराच न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे दोन्ही गटाला निवडणुकीदरम्यान सावध पाऊलं टाकावी लागणार आहेत. मात्र अजित पवार गटाने आपण सर्व सूचनांचे पालन करत असल्याचे प्रतिज्ञापत्र आणि पुरावे सादर करू असे आश्वासन न्यायालयात दिले आहे. तर शरद पवार गटाकडून तक्रार करण्यात आली होती. याची दखल घेत न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला नव्याने प्रतिज्ञापत्र सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शरद पवार गटाचे वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना म्हटले की, घड्याळ हे चिन्ह दोघांपैकी कोणालाही मिळू नये अशी आमची मागणी होती. मात्र तुम्ही १९ मार्च रोजी हे चिन्ह बहाल करताना काही अटी घातल्या होत्या. त्या अटींचे पालन अजित पवार गटाकडून केले जात नाही. तसेच शरद पवार यांच्या नावाचाही वापर होऊ नये असा आदेश होता. मात्र, घड्याळ हे चिन्ह अजूनही शरद पवार या नावाशी जोडले गेले आहे, याकडे मनु सिंघवी यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले. तर अभिषेक मनु सिंघवीं यांनी पुढे म्हटले की, जे चिन्ह कोर्टाच्या विचाराधीन आहे तेव्हा त्याचा फायदा दोघांपैकी एकाला व्हायला नको, हे चिन्ह पक्ष फुटीपूर्वीचे आहे. या निरीक्षणांच्या आधारेच न्यायालयाने चिन्हाचा वापर करताना प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे सर्वत्र लिहिण्यात यावे, असे आदेश दिले होते. मात्र त्याचे पालन होत नाही. यावेळी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींकडून अजित पवारांच्या वकीलांना विचारणा करण्यात आली. तुम्ही नियमांचे पालन करत नाही का? असा खडा सवाल न्यायालयाने विचारला. यावर आम्ही नियमानुसार चिन्ह वापरत आहोत असे अजित पवार गटाचे वकील बलवीर सिंग यांच्याकडून सांगण्यात आले. तर सगळे फोटो शरद पवार पक्षाकडून दाखवले जात नाहीत, असा दावा सुद्धा बलबीर सिंग यांनी केला. दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने घड्याळ चिन्हाच्या या वादावरुन दोन्ही गटाला खडसावले आहे. न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करा, नाहीतर आम्ही अवमानाचा ठपका ठेवू, असा इशारा न्यायालयाने दिला आहे. तुम्ही दोघांनी तुम्हाला दिलेले निर्देश पाळले पाहिजेत. जर मुद्दाम निर्देशांचे उल्लंघन कोणी केलं तर आम्ही स्वतःहून अवमान ठपका ठेवू, असेही न्यायालय म्हणाले. यानंतर अजित पवार गटाकडून त्वरित 'आम्ही स्वतःहून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन केल्याचे प्रतिज्ञापत्र आणि पुरावे सादर करू,' असे आश्वासन देण्यात आले.

# नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या बाबत मागण्या मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्य बाबत मागण्यांमध्ये मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे यावेळी पंढरपूर नगरपरिषद कामगार संघटना अखिल भारतीय सफाई मजदूर संघटना काष्टा संघटनेचे पदाधिकारी अँड सुनील वाळुंजकर, महादेवादापुरे, नानासाहेब वाघमारे, शरद वाघमारे, नागनाथ तोडकर, संतोष सरोवर, धनाजी वाघमारे, किशोर खिलारे, राम सर्व गोड, बाली भेंडीपू, गुरु दांडिया, यांच्या शिष्टमंडळासमोर मुख्याधिकारी डॉ प्रशांत जाधव यांच्यासमित चर्चा झाली त्यामध्ये प्रामुख्याने खालील मागण्या मान्य करण्यात आल्या.

पंढरपूर नगरपरिषद मधील सर्व कर्मचाऱ्यांना दिवाळी डव्हान्स रुपये १२५०० देण्यात येथील.

सेवानिवृत्त झालेल्या १/१/२०२३ते३१/३/२०२४ पर्यांच्या साठ कर्मचाऱ्यांना रजा वेतन व उत्पादनाची रक्कम देण्यात येईल जानेवारी २०२४ ते जून २०२४ सहा महिन्यात चार टक्के महागाई भत्ता याचा फरक देण्यात येईल, सातवा वेतन मधील राहिलेले चौथा व पाचवा हप्ता देण्यात येईल तसेच सर्व कर्मचाऱ्यांचे कॅशलेस विमा उतरण्यात येईल, शासनाने दिवाळीपूर्वक कर्मचाऱ्यांची पगार करावीत म्हणून परिपत्रक काढल्यास ऑक्टोबर २४ ते नोव्हेंबर २४ चा पगार करण्यात येईल, सर्व कर्मचाऱ्यांना शासनाच्या निर्देशानुसार १०/२०/३० ची कालबद्धता पदोन्नती देण्यात येईल मुकादामाची रिक्त पदे भरण्यात येतील

या चर्चेला कामगार संघटनेचे पदाधिकारी संतोष सर्व गोड, धनाजी वाघमारे दिनेश साठे दत्ता चंदनशिवे जयंत पवार महावीर कांबळे दशरथ यादव संदेश कांबळे महेश गोयल संजू वायदंडे सतीश सोलंकी वैभव दंडाळे लक्ष्मीकांत सोनवणे अनिल गोयल इत्यादी जण उपस्थित होते.

### सचिन बेंडभर यांच्या काव्यसंग्रहास चौथा पुरस्कार प्रदान

# मसाप दामाजीनगर व प्रेरणा प्रतिष्ठानकडून मामाच्या मळ्याला राज्यस्तरीय पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दामाजीनगर व प्रेरणा प्रतिष्ठान मंगळवेढा यांच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा संभाजी सलगर पुरस्कृत ज्ञानोबा सलगर स्मृती पुरस्कार प्रसिद्ध बालसाहित्यिक सचिन बेंडभर यांच्या दिलीपराज प्रकाशनने प्रकाशित केलेल्या मामाच्या मळ्यात या बालकाव्यसंग्रहास मिळाला आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष व सोलापूर जिल्हा प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली व सहाय्यक कुलसचिव तथा मराठी भाषा अधिकारी शिवाजी शिंदे यांच्या शुभहस्ते, परिषदेचे अध्यक्ष प्रकाश जडे व कार्याध्यक्ष दिगंबर भगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे हे पाचवे वर्ष असून या काव्यसंग्रहास २०२३ सालचा हा चौथा पुरस्कार आहे. रोख रक्कम, सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.



जिल्ह्यातील प्रसिद्ध बालसाहित्यिक सचिन बेंडभर यांच्या मामाच्या मळ्यात

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दामाजीनगर आणि प्रेरणा प्रतिष्ठान मंगळवेढा यांच्या वतीने २०२३ मध्ये प्रकाशित झालेल्या साहित्यास राज्यस्तरीय उत्कृष्ट वाड्मय पुरस्कार नुकतेच प्रदान करण्यात आले. या पुरस्कारासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून प्रवेशिका आल्या होत्या. बालसाहित्य विभागात पुणे

या कवितासंग्रहाला प्रथम क्रमांक मिळाला असून परिषदेच्या वतीने देण्यात येणारा संभाजी सलगर पुरस्कृत ज्ञानोबा सलगर स्मृती पुरस्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष व सोलापूर जिल्हा प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली व सहाय्यक कुलसचिव तथा मराठी भाषा अधिकारी शिवाजी शिंदे यांच्या शुभहस्ते, परिषदेचे अध्यक्ष प्रकाश जडे व कार्याध्यक्ष दिगंबर भगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. यावेळी श्रीकांत पाटील, धनंजय पाटील, डॉ. महेश खरात आदी साहित्यिक उपस्थित होते. परीक्षक म्हणून डॉ. दत्ता सरगर यांच्या अध्यक्षतेखाली रेखा जडे व प्रा. विश्वनाथ ढेपे यांनी काम पाहिले. सचिन बेंडभर यांच्या काव्यसंग्रहास २०२३ सालचा हा चौथा पुरस्कार असून याआधी चंद्रपूर येथील कवितेचे घर यांच्या वतीने बापूरावजी पेटकर बालकाव्य पुरस्कार, ॲक्टिव्ह टीचर सामाजिक प्रतिष्ठान, महाराष्ट्र यांच्या वतीने उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार आणि साहित्य सेवा प्रज्ञा मंच यांच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय उत्कृष्ट वाड्मय पुरस्कार असे प्रतिष्ठेचे मानले जाणारे पुरस्कार या काव्यसंग्रहास मिळाले आहेत. या काव्यसंग्रहासाठी २०२३ सालचा हा मानाचा चौथा सन्मान असून या काव्यसंग्रहास निवड समितीने प्रथम क्रमांक जाहीर केला आहे. मामाच्या मळ्यात या काव्यसंग्रहात लहान मुलांसाठी मनोरंजनात्मक कविता असून त्यांच्या ज्ञानात भर पडेल अशा प्रेरक कवितांचा समावेश आहे. लहान बाल चमुंसाठी संस्काराची शिदोरी म्हणजे सचिन बेंडभर यांचा मामाच्या मळ्यात हा काव्यसंग्रह! दिलिपराज प्रकाशनने हा काव्यसंग्रह प्रकाशित केला असून प्रसिद्ध चित्रकार सागर नेने यांनी विषयाला अनुरूप चित्रे व आकर्षक मुखपृष्ठ रेखाटले आहे. प्रसिद्ध बालसाहित्यिक सुरेश सावंत यांनी या पुस्तकाची पाठराखण केली आहे. सचिन बेंडभर यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल शिक्षण आणि साहित्य क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# भीमा कोरेगाव आयोगाच्या वकिलांवर प्राण घातक हल्ल्याचा कट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी/प्रतिनिधी : भीमा कोरेगाव आयोगात आंबेडकरी समाजाची बाजू मांडणारे भिवंडीतील वकील एड. किरण चन्ने यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्याचा कट होत असल्याचा आरोप चन्ने यांनी बुधवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला आहे. या हल्ल्याच्या कटा मागे भिवंडी पश्चिमचे भाजप आमदार महेश चौघुले व त्यांचे कार्यकर्त असल्याचा आरोप देखील चन्ने यांनी या पत्रकार परिषदेत केला आहे.

मागील काही महिन्यांपासून भाजप आ. महेश चौघुले व ॲड.किरण चन्ने यांच्यात शाब्दिक वादावादी सुरु असून चन्ने यांच्यावर यापूर्वी देखील हल्ल्याचा कट आ.चौघुले यांनी रचला होतो मात्र त्यावेळी आपण थेट ठाणे पोलीस अधीक्षकांना याबाबत माहिती दिल्या नंतर पोलीस अधीक्षकांनी त्यावेळी आपल्याला पोलीस संरक्षण देऊन हल्लेखोरांचा कट उधळवून टाकला होता अशी माहिती देखील चन्ने यांनी दिली असून आपण भिवंडी पश्चिम मतदारसंघातून निवडणूक लढण्याची इच्छा व्यक्त केल्या नंतर शुक्रवारी १८ तारखेला आपण कामानिमित्त बाहेर गेलो असता आ.चौघुले यांच्या कार्यकर्त्यांनी अपल्याबाबत खोटी अफवा पासर्वल्याने शुक्रवारी रात्री देखील चौघुले यांच्या गुंडांकडून आपली हत्या करण्याचा कट् होता,आपण रहात असलेल्या इमारतीच्या बाजूला हत्यारबंद गुंड परिसरात उभे होते.त्यानांतर आ.चौघुले देखील आपल्या कार्यकर्त्यांसह येथे आले होते.माझी हत्या करण्याचा हा संपूर्ण कट् असून मला पोलिसांनी संरक्षण दिले आहे मात्र पोलीस चौघुले व त्यांच्या गुंडांवर कोणतीही कारवाई करत नाही अशी प्रतिक्रिया ॲड. किरण चन्ने यांनी या पत्रकार परिषदेत दिली असून लवकरात लवकर पोलिसांनी माझ्यावर हल्ला करण्याचा कट करणाऱ्या आरोपींना अटक करावी अन्यथा यासाठी आपण जनआंदोलन करू अशी प्रतिक्रिया चन्ने यांनी दिली आहे.

# सैनिक टाकळी मध्ये श्री पांडुरंग सहकारी दूध संस्था यांच्यामार्फत दूध उत्पादकांना दिवाळी सणानिमित्त बोनस आणि साहित्य वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी /पत्रकार संजय चव्हाण : श्री पांडुरंग सहकारी दूध संस्था टाकळी या संस्थेने सन २०२३ २४ मध्ये संस्थेत दूध पुरवठा केलेल्या दूध उत्पादक सभासदांना म्हैस दूध प्रति लिटर पाच रुपये ५० पैसे व गाय दुधास प्रति लिटर चार रुपये याप्रमाणे दूध दर फरक वाटप केला.

त्याचबरोबर संस्थेस दूध पुरवठा करत असलेल्या दूध उत्पादकांना दिवाळी भेटवस्तू देण्यात आली.

यावेळी संस्थेचे चेअरमन श्री रघुनाथ कृष्ण पाटील. व्हाईस चेअरमन विजय बाबुराव पाटील सचिव दिलीप आबासो जठार. व इतर सर्व संचालक हजर होते. त्या सर्वांच्या हस्ते दिवाळी बोनस व भेटवस्तू देण्यात आल्या संस्थेची सुरुवात अगदी शून्यापासून तयार झाले. संस्थेने अल्पावधी काळामध्ये मोठी गगनभरारी घेतली आहे.




पांडुरंग दूध संस्था नेहमीच दूध उत्पादकांचे हित जपत आले आहे. योग्य फॅट योग्य एस .एन. एफ. व वाढीव दर देऊन दूध उत्पादकांचे हित जपले आहे.

संस्थेमध्ये पशुखाद्य उपलब्ध करून दिले जाते. पशुवैद्यकीय सेवा मोफत केली जाते. संस्थेने दिवाळी सणानिमित्त उच्चांकी बोनस तसेच साहित्य वाटप यांची परंपरा कायम राखली आहे. त्याबद्दल उत्पादकांकडून समाधान व्यक्त केले जाते. दूध उत्पादक पांडुरंग दूध संस्था हे आपले संस्था आहे असे समजून कायमस्वरूपी दूध पुरवठा करत असतात.

# युनिक इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय तायक्कांदो क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी : सोलापूर महानगरपालिका स्पर्धा आयोजन २०२४-२५ यात शाळेच्या विद्यार्थ्यांनी शालेय जिल्हास्तरीय तायक्कांदो स्पर्धेत प्राविण्य संपादन केले. यात शाळेचा पृथ्वीसिंग हजारे यांनी १७ वर्ष वयोगटातील ७३ ते ७८ या वजनी गटात स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून घवघवीत यश संपादन केले. शालेय जिल्हास्तर जिंकून विभागीय स्पर्धेत खेळण्यासाठी त्याची निवड झाली आहे. तसेच चेतन जोशी १७ वर्ष वयोगटात ६३-६८ वजनी गटात द्वितीय क्रमांक संपादन केला. तसेच सचिन बिद्री १७ वर्ष वयोगटात ३८-४१ वजनी गटात तृतीय क्रमांक संपादन केला. तसेच मानसी बिराजदार १७ वर्ष वयोगटात ५२-५५ वजनी गटात तृतीय क्रमांक संपादन केला.शाळेचे क्रीडा शिक्षक अमर पाटील सर व तायक्कांदो प्रशिक्षक मंजूर शेख सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन राजशेखर शिवदारे सर तसेच संस्थेचे विश्वस्त भीमाशंकर शेटे सर शाळेच्या शैक्षणिक सल्लागार सौ. अंजली तिवारी व शाळेच्या मार्गदर्शिका डॉ. शुभदा उपासे व शाळेच्या मुख्याध्यापिका सौ .पूजा बाजपेयी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे कौतुक केले.

# शिक्षण उपयोजित तयार केली शैक्षणिक साधनांची भिंत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोदिंया/प्रतिनिधी : शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, जो प्राशन करणार तो नक्कीच गुरगुरणार हे ब्रीदवाक्य तंतोतंत खरे आहे. तसेच आजच्या परिस्थितीत शिक्षण सर्व मानव जातीच्या घटकांसाठी आवश्यक आहे. त्यासाठी औपचारिक शिक्षण शाळेत घेऊन प्रचंड ज्ञान मिळविले पाहिजे. यासाठी उपयोजित शिक्षण देतांना साधनांचा प्रत्यक्षपणे उपयोग करावा लागतो. अशा वैज्ञानिक व शैक्षणिक दृष्टीकोनातून अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपुरा-मुर्री येथील माध्यमिक शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी यांच्या संकल्पनेतून वर्ग नववीतील विद्यार्थ्यांनी शिक्षण उपयोजित शैक्षणिक साधनांची भिंत तयार केली आहे.

### नंगपुरा-मुर्री निवासी शाळा : शालेय सामाजिकशास्त्र मंडळाचा उपक्रम

सदर शाळा ही नानाविध अनेक उपक्रम राबवित असते. शालेय शिक्षण घेण्यासोबतच मानवाच्या सर्वांगीण विकासावर सदर शाळा भर देत असून नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची नवीन रुची निर्माण केली जात आहे. उपक्रमातून विद्यार्थी हे ज्ञानात्मक कौशल्य हस्तगत करतात.

समावेशित साधने

सदर उपयोजित शैक्षणिक उपक्रम हा सामाजिक शास्त्र शालेय मंडळाने शालेय समिती प्रमुख मार्गदर्शक शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी यांच्या मार्गदर्शनाखाली, संविधान प्रास्ताविक, इतिहासाची साधने, संविधानातील कलम ५१ याची वैशिष्ट्ये, स्वच्छ भारत, एक कदम स्वच्छता की ओर, जूने एक रुपया नाणी, मौखिक साधने वृत्तपत्र पत्राचे संकलित साधने, मिश्र अर्थव्यवस्था, साम्यवादी अर्थव्यवस्था, लिंग गुणोत्तर, लोकसंख्या वाढीचा दर, राष्ट्रपती दलाचे कार्य व अधिकार, अहवाल लेखन, क्षेत्रभेटीचे अहवाल, जपानची भाषा वैशिष्ट्ये, भौगोलिक आवरणे आदी साधने तयार करून वर्गखोलीत शैक्षणिक साधनाची भिंत निर्माण केली.

नवीन नवीन कल्पना डोक्यात घर करून असतात, तेव्हा कल्पनांचा उपयोग व्हावा म्हणून नवनवीन उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये औपचारिक व उपयोजित शिक्षण रुजवून सर्वांगीण विकास झाला पाहिजे हा मुख्य दृष्टीकोन बाळगला आहे. तसेच कला, कौशल्ये व क्रीडा यांचाही शिक्षणात महत्त्वाचा भाग आहे म्हणून याबाबी गरजेच्या असतात. सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्व प्रकारचे शिक्षण सध्याच्या काळात विद्यार्थ्यांना देणे मला अतिशय महत्त्वाचे वाटते.

- मुन्नाभाई नंदागवळी (मार्गदर्शक शिक्षक) समिती प्रमुख, सामाजिक शास्त्र मंडळ, अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, नंगपूरा-मुर्री

पांढरे कागद, पेन, पेन्सिल, खोडरबर, केच्सपेन यांचा उपयोग केला.

यामध्ये हेमंत लाडे, यश वालदे, सागर कोहरे, संचित शहारे, आदित्य जमदाळ, कुणाल मेश्राम, तन्मय साऊस्कार, ममीत वालदे, तुषार सऊस्कार, कुणाल बडोले, अनमोल भेलावे, अथर्व शहारे, अमित भोंडेकर, यश टेंभूर्णे, करण शहारे, चेतन चौधरी, प्रियांशू जनबंधू, आर्यन शहारे, लोकेश मेश्राम, सारश गजभिये, आशिष शामकुरे, आर्यन सोनवणे, धम्मदीप खोब्रागडे, हर्ष पंधरे, आयुष जांभूळकर, पृथ्वीराज भोगारे, विकास कराडे, नैतिक शहारे, सुजित वालदे, दक्ष मेश्राम, मोहित उईके, धृप लटये, चैतन्य जनबंधू, यश तांडेकर, नैतिक कुडवे, या विद्यार्थ्यांचा समावेश होता. शालेय स्तरावर अनेक उपक्रम राबवत असताना समाज कल्याण सहाय्यक आयुक्त विनोद मोहतूरे व मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### बंद घराचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) घराच्या मुख्य दरवाजाचे लोखंडी कुलूप कशाच्या तरी साह्याने तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करत घरातील १ लाख ८१ हजार ८०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची फिर्याद हरीष दिगंबर कोंगारी (वय-४२,रा.कामुनी रो हाऊस नंबर ८,सर्वे नंबर १७७/१/१/प्लॉट नंबर २२ अविनाश नगर,एमआयडीसी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक चंदनशिवे हे करीत आहे.

### किरकोळ कारणावरून मारहाण ; चालकावर गुन्हा

सोलापूर : किरकोळ कारणावरून मारहाण केल्याप्रकरणी बुलेरो गाडी एम एच.१३.बीएन.०२०४ यातील चालकाविरुद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.याप्रकरणी अनिल शिवानंद मैंदर्गी (वय-३२,रा.मित्र नगर,शेळगी) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.ही घटना २२ ऑक्टोंबर रोजी दुपारी पाच वाजण्याच्या दरम्यान ख्रिश्चन स्मशानभूमी येथे घडली. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी हे त्यांच्या ताब्यातील चारचाकी वाहन क्रमांक एमएच.१३.डीटी.९७६५ हे घेऊन एजी पाटील कॉलेज ते मालक कल्पेश झवेरी यांच्या घराकडे जाताना वरील क्रमांकाच्या बुलेरो चालकाने त्याच्या ताब्यातील गाडीचे दोन्ही दार उघडून रस्त्यावर उभा होता.त्यावेळी फिर्यादी यांनी हॉर्न वाजवून दार बंद करण्याचा इशारा केला असता,वरील चालकाने गाडी थांबून फिर्यादी जवळ येऊन फिर्यादीस शिवीगाळ करून गाडीमधून प्लास्टिक पाईपने फिर्यादीच्या मानगटावर मारहाण करून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पोलीस हवालदार जमादार हे करीत आहेत.

# महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर येणार : खा.सुप्रिया सुळे

## हर्षवर्धन पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल; इंदापूरची तुतारी मंत्रालयात जाणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी / अतुल सोनकांबळे : महाराष्ट्र हा सध्याच्या भ्रष्टाचारी सरकारपासून मुक्त करावयाचा आहे. तसेच दूध, कांदा, सोयाबीन आदी पिकांना चांगला भाव देऊन शेतकऱ्यांना न्याय द्यायचा आहे. महाराष्ट्र राज्य हे देशात एक क्रमांकाचे राज्य बनवायचे आहे. निवडणुकीनंतर महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर येणार आहे, त्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी, असे आवाहन खा. सुप्रिया सुळे यांनी इंदापूर येथे गुरुवारी (दि.२४) केले.

माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी इंदापूर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून महाविकास आघाडीचे उमेदवार उमेदवार म्हणून गुरुपुष्पामृतच्या मुहूर्तावर भव्य रॅली काढून गुरुवारी (दि.२४) अर्ज दाखल केला. यावेळी खा.सुप्रिया सुळे उपस्थित होत्या. दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल करणेपूर्वी भाग्यश्री निवासस्थानी हर्षवर्धन पाटील यांचे खा. सुप्रिया सुळे, भाग्यश्री पाटील, अंकिता पाटील ठाकरे यांनी औक्षण केले.

उमेदवारी अर्ज दाखल झालेनंतर आयोजित महाविकास आघाडी कार्यकर्त्यांच्या भव्य मेळाव्यात खा.सुप्रिया सुळे बोलत होत्या. या मेळाव्याला कार्यकर्त्यांची प्रचंड गर्दी झाली होती. या गर्दीचीच मेळाव्यानंतर चर्चा सुरू होती.

सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या, राज्याच्या विकासाच्या दृष्टीने ही निवडणूक टर्निंग पॉईंट ठरणार आहे. हर्षवर्धन पाटील हे राज्यपातळीवर काम करणारी नेते आहेत, त्यांना आता राज्यभर काम करावे लागणार आहे. निवडणुकीनंतर विजयाचे सर्टिफिकेट घेऊनच आपण मुंबईला जाऊ या, असे आवाहन सुप्रिया सुळे यांनी केले.

### इंदापूरची तुतारी मंत्रालयात जाणार : खा. सुप्रिया सुळे

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी इंदापूरची तुतारी विधानसभेत पोहोचणार असल्याची ग्वाही इंदापूर येथे दिली होंती. त्याचा संदर्भ घेऊन सुप्रिया सुळे यांनी तुतारी विधिमंडळ बरोबर मंत्रालयातील पोचणार असल्याचे नमूद करताच कार्यकर्त्यांनी टाळ्यांचा कळकाट केला.**

काही लोकं तिकिटासाठी दिल्लीला गेले. आपण सगळं महाराष्ट्र मध्ये ठरतं, असा टोलाही सुप्रिया सुळे यांनी महायुतीतील घटक पक्षांना लगावला. ज्यांच्याकडून कॉन्ट्रॅक्ट दिले जाते ते पैसे घेतात त्यामुळे कामाची गुणवत्ता राहत नाही, आपणास खड्डे मुक्त रस्ते तयार करायचे आहेत, असे सुप्रिया सुळे यांनी नमूद केले.

हर्षवर्धन पाटील भाषणात म्हणाले, महाराष्ट्रामध्ये शरद पवार यांचे एवढे ज्येष्ठ नेते कोणीच नाही. ८४ वर्षाचे संघर्ष योद्धा शरद पवार यांना अडचणीच्या काळात साथ देण्याचा आपण निर्णय घेतला आहे. मात्र इथल्या विद्यमान लोकप्रतिनिधींनी अडचणीच्या काळात शरद पवार साहेबांना धोका दिला आहे. त्यामुळे इथल्या लोकप्रतिनिधींना त्यांची जागा मतदारांनी दाखवून द्यावी.

विद्यमान लोकप्रतिनिधींनी सन २००९ मध्ये आमदारकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस सोडली होती, त्यावेळी त्यांना ६ वर्षासाठी पक्षातून काढून टाकण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. तसेच दोन वर्षांपूर्वी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या विरोधात त्यांनी भूमिका घेतली. शरद पवार यांचे आशीर्वाद आपल्या पाठीशी असल्याने आता इंदापूर तालुक्यात विधानसभेला बदल घडणारच, असा विश्वास हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केला. ज्येष्ठ नेते शंकररावजी पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी इंदापूर तालुक्यात सर्वधर्मसमभावाचा विचार मांडला. त्याच सर्वधर्मसमभावाच्या विचारानुसार आम्ही कार्यकर्ते वाटचाल करीत आहोत. आगामी ५ वर्षात इंदापूरचा चेहरा मोहरा बदलायचा आहे, तालुक्याचा सर्व क्षेत्रातील विकास करावयाचा आहे. तालुक्यातील शेतीच्या सिंचनाचा प्रश्नही प्राधान्याने सोडविला जाणार आहे, अशी ग्वाही हर्षवर्धन पाटील यांनी भाषणात दिली. यावेळी पृथ्वीराज जाचक, मुरलीधर निंबाळकर, राहुल मखरे, तेजसिंह पाटील, अँड कृष्णाजी यादव, विलासराव वाघमोडे, भारतीताई शेवाळे, अशोक घोगरे, सागरबाबा मिसाळ, नितीन शिंदे, काका देवकर, प्रा.कृष्णाजी ताटे, अनिल पवार, संजय शिंदे, बाबासाहेब भोंग, तुषार खराडे यांनी मनोगत व्यक्त केले.

### २५ दिवस द्या, ५ वर्षे माझी जबाबदारी : हर्षवर्धन पाटील

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मतदान होईपर्यंत २५ दिवस पक्षासाठी द्या, नंतरची ५ वर्षे माझी जबाबदारी राहील, असे आवाहन भाषणात केले.**

या सभेमध्ये इंदापूर शहरातील अनिलअण्णा पवार (मेम्बर) यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह तसेच बावडा ग्रा.पं. सदस्य पांडुरंग कांबळे, सुनील साबळे, विनोदकुमार जाधव यांनी असंख्य सहकाऱ्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षामध्ये प्रवेश केला. यांचा सत्कार खा.सुप्रिया सुळे व हर्षवर्धन पाटील यांनी केला.

यावेळी निरा भिमा कारखान्याचे अध्यक्ष लालासाहेब पवार, अंकिता पाटील ठाकरे, महारुद्र पाटील, राजवर्धन पाटील, महिला तालुकाध्यक्षा छायाताई पडसळकर, कार्याध्यक्षा आश्मा मुलाणी, मयूरसिंह पाटील, अमोल भिसे, सुखदेव घोलप, आशुतोष भोसले, उदयसिंह पाटील, हेमंत नरुटे, उमेश घोगरे, चांगदेव घोगरे, शहराध्यक्ष इनायत काझी, महिलाध्यक्षा रेश्मा शेख, बाळासाहेब पाटील, नंदकुमार सोनवणे, प्रदीप पाटील, मोहन दुधाळ, पांडुरंग शिंदे, शिवाजी हांगे, बापू कोकाटे आदींसह शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ), काँग्रेसचे व विविध संस्थांचे पदाधिकारी, संचालक, कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सूत्रसंचालन कैलास कदम व राजेंद्र पवार यांनी तर आभार अँड.शरद जामदार यांनी मानले.

### पवार साहेबांनी राज्याचा विचार करून उमेदवारीचा निर्णय घेतला : हर्षवर्धन पाटील

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षातून ६ जणांनी उमेदवारी मागितली होती. लोकशाहीमध्ये उमेदवारीची इच्छा व्यक्त करणे योग्यच आहे. मीही पक्षाकडे उमेदवार मागणीचा अर्ज केला. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी राज्याचा सारासार विचार करून माझ्या उमेदवारीचा निर्णय घेतला. माझे पक्षातील या सहकाऱ्यांना आवाहन आहे की, पवार साहेबांचा विचार सोडू नका, त्यांचे हात बळकट करण्याची गरज आहे. उमेदवारी मागणारे सर्वजण आम्ही एकमेकांच्या जवळचे सहकारी आहोत. त्यामुळे यातून निश्चित मार्ग निघेल, असे हर्षवर्धन पाटील यांनी भाषणात नमूद केले.**

# डॉ. राजेंद्र शिंगणे यांचा आज होणार उमेदवारी अर्ज दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी / राहुल साबळे :

सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघातील डॉ.राजेंद्र शिंगणे यांचा महाविकास आघाडीच्या शरद पवार गटाकडून दिनांक २५ आक्टोंबर रोजी संसदरत्न खा. अमोल कोल्हे यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल होणार आहे.विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात अनेक राजकीय उलथापालथी होत आहेत. जिंकण्याची खात्री नसणे आणि उमेदवारी डावलली जाण्याच्या शक्यतेमुळे अनेक नेते या पक्षातून त्या पक्षात पक्षप्रवेश सुरू आहेत. नुकतेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षात असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून यंदाची विधानसभा निवडणूक घड्याळ की तुतारी, यापैकी कोणत्या चिन्हावर लढवायची याबाबत शिंगणे यांनी संभ्रम निर्माण केला होता. पण अखेर त्यांनी शरद पवार यांची साथ देण्याचा निर्णय घेतला. शिंगणे यांच्या प्रवेशामुळे आता बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा मतदारसंघाचे चित्र बदलले आहे.



महायुतीकडून याठिकाणी कुणाला उमेदवारी मिळणार? हा प्रश्न उपस्थित झाला असून डॉ.राजेंद्र शिंगणे यांची पुतणी गायत्री शिंगणेने बंडाचे निशाण फडकवत थेट शरद पवारांनाच सवाल विचारला आहे.तब्बल पाचवेळा सिंदखेड राजा मतदारसंघाचे आमदारपद भूषवणारे शिंगणे यांनी मागील महिनाभरापासून मतदारसंघातील राजकीय संभ्रम कायम ठेवला.तांत्रिकदृष्ट्या ते अजित पवार यांच्यासोबत होते,मात्र मनाने शरद पवारांसोबत! यामुळे, महायुतीकडून लढणार की शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये परतणार? याबद्दल संभ्रम कायम ठेवण्याचे त्यांचे डावपेच यशस्वी ठरले.आता त्यांनी ‘तुतारी’ फुंकण्याचा निर्णय घेतला आहे.मुंबईत शरद पवार, जयंत पाटील यांच्या उपस्थितीत शिंगणे यांचा पक्षप्रवेश पार पडला.शरद पवार गटाकडून डॉ राजेंद्र शिंगणे यांना उमेदवारी देण्यात आली व २५ आक्टोंबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

### डॉ.शिंगणे यांना महायुतीचा प्रतिस्पर्धी कोण

महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा अर्ज दाखल होणार तरी पण महायुतीच्या उमेदवाराचा तिढा सुटलेला दिसत नाही.सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत डॉ.शिंगणे ना कोण प्रतिस्पर्धी. सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघात कशी रंगत होणार याकडे मतदारांचे लक्ष लागुन असल्याचे पाहायला मिळत आहे.

# स्वेरी पंढरपूर, एनपीसीआयएल, तारापूर व भाभा अणुसंशोधन केंद्र मुंबई यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : ‘तारापूर (पालघर) येथील न्युक्लियर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (एन.पी.सी.आय.एल), मुंबई येथील भाभा अणुसंशोधन केंद्र (बी.ए.आर.सी) आणि गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील ‘स्वेरी’ तथा श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पंढरपूर यांच्यात नुकताच त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला आहे’, अशी माहिती स्वेरीचे संस्थापक सचिव तथा स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी दिली.

न्युक्लियर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (एन.पी.सी.आय.एल), तारापूर, भाभा अणुसंशोधन केंद्र (बी.ए.आर.सी), मुंबई आणि श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट (स्वेरी), पंढरपूर यांच्यात नुकताच हा त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून उद्योजकता विकासास गती देणे, संशोधन आणि प्रशिक्षणाला प्रोत्साहन देणे तसेच ग्रामीण भागाच्या विकासासाठी भाभा अणुसंशोधन केंद्राच्या तंत्रज्ञानाचा प्रसार करणे या बाबींचा समावेश आहे. त्यासोबतच संयुक्त संशोधन प्रकल्प हाती घेणे, कौशल्य विकासासाठी विविध उपक्रम राबवणे आणि तंत्रज्ञान हस्तांतरण या प्रमुख बाबींचा देखील या सामंजस्य करारात समावेश आहे. या कराराच्या माध्यमातून भाभा अणुसंशोधन केंद्राच्या संशोधन सुविधा, न्युक्लियर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (एन.पी.सी.आय.एल) च्या निधीचा आणि स्वेरीच्या कार्यप्रणाली तथा कार्य कौशल्यांचा मिलाप करून तंत्रज्ञानाची देवाणघेवाण आणि प्रगतीसाठी चालना मिळणार आहे. हा महत्वपूर्ण सामंजस्य करार श्री. आर. एस. सावंत (साइट डायरेक्टर, एन.पी.सी.आय.एल., तारापूर), डॉ. एस.अधिकारी (संचालक, केएमजी, बी.ए.आर.सी., मुंबई), श्री. सूरज रोंगे (विश्वस्त, स्वेरी, पंढरपूर), श्री. प्रमोद कुमार मिश्रा (अध्यक्ष, सी.एस.आर., एन.पी.सी.आय.एल., तारापूर), श्री. डॅनियल बाबू (प्रमुख टीटी अँड सीडी, बी.ए.आर.सी., मुंबई), भारती भालेराव (आकृती ग्रुप लीडर, टीटी अँड सीडी, केएमजी, बी.ए.आर.सी., मुंबई), श्री. प्रहुपद दास (सदस्य-सचिव, सी.एस.आर., एन.पी.सी.आय.एल., तारापूर), डॉ. आर. एस. पवार (प्रकल्प कार्यकारी अधिकारी, आकृती केंद्र, तारापूर) आणि डॉ. आर. आर. गिड्डे (प्रशासन अधिष्ठाता, स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस), पंढरपूर) या मान्यवरांच्या उपस्थितीत व स्वाक्ष-यांसह करण्यात आला. हा महत्वपूर्ण करार झाल्याबद्दल स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, सर्व विश्वस्त व पदाधिकारी, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी.मणियार, डी. फार्मसीचे प्राचार्य. प्रा. एस.व्ही. मांडवे, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व पालकांनी अभिनंदन केले.

जागतिक मानसिक आरोग्य दिन

अलका काकडे यांचे प्रतिपादन

# उत्पादकता व गुणवत्ता वाढविण्यासाठी मानसिक तंदुरुस्ती महत्त्वाची

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : कामाच्या ठिकाणी जर कर्मचाऱ्यांची मानसिक तंदुरुस्ती असेल तर त्यांची उत्पादकता व गुणवत्ता वाढू शकते. म्हणून त्यासाठी शारीरिक तंदुरुस्ती बरोबर कर्मचाऱ्यांने आणि व्यवस्थापनाने त्यांच्या मानसिक तंदुरुस्ती कडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन मानसतज्ञ व समुपदेशिका अलका काकडे यांनी केले.




जागतिक मानसिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने ल. गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशन आणि फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शन प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते.

तर व्यासपिठावर एफ. पी. ए. आय. सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, ल. गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशनच्या विश्वस्त प्रा. डॉ. नभा काकडे, मानसतज्ञ व समुपदेशिका मानसी काकडे - कुलकर्णी, इंडियन रेड क्रॉस सोसायटी सोलापूर शाखेचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, फॅमिली प्लँनिंगच्या सदस्या प्रा. डॉ. विजया महाजन, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते. यावेळी मानसी काकडे - कुलकर्णी यांनी चेकलिस्टच्या आधारे उपस्थितांच्या मानसिक स्वास्थ्याबद्दल महत्त्वाच्या बाबी सांगितल्या व कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्य जपण्यासंबंधी मार्गदर्शन केले. अलका काकडे व मानसी काकडे - कुलकर्णी या दोन्ही समुपदेशकांनी सहभागी संस्थांच्या कर्मचाऱ्यांनी व प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.

या कार्यक्रमात सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती ट्रकर्स, मायग्रंट व सखी वन स्टॉप सेंटर, क्रांती महिला संघ, निरामय आरोग्यधाम, सारथी युथ फाऊंडेशन, नेटवर्क ऑफ सोलापूर बाय पीपल लिविंग विथ एच.आय.व्ही एड्स, शेळगी नागरी आरोग्य केंद्र, जोडभावी पेठ नागरी आरोग्य केंद्र, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा आदी सामाजिक संस्थांचे ५५ प्रतिनिधी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत प्रा. डॉ. एन.बी. तेली यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. नभा काकडे यांनी केले. सूत्रसंचालन भरत पाटोळे यांनी केले तर आभार प्रतिक्षा धोत्रे-बंदपट्टे यांनी मानले.

# जगदगुरू पंचाचार्य प्रशालेत मोफत पाठ्यपुस्तक वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : गौडगाव बु!! येथील श्री गुरु सिद्धमल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगद्गुरु पंचाचार्य प्रशालेत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडून माध्यमिक शाळातून मोफत पुस्तक पेढी योजनेअंतर्गत इयत्ता दहावी मध्ये शिकत असलेल्या अनुसूचित जातीचे विद्यार्थी व विद्यार्थिनींना पुस्तक संच वाटप करण्यात आले यावेळी मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी. शिवपुत्र चोले. महेश स्वामी. शरणया हिरेमठ .पोपट सोनकांबळे. गंगाधर नागशेट्टी .मृत्युंजय सालीमठ .अशोक गुरव नागनाथ जमादार उपस्थित होते



दैनिक यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### सोलापूर विमानतळच्या सार्वजनिक संपत्तीची हानी ; सहा अनोळखी इसमानवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) पाच ते सहा अज्ञात इसमांनी सोलापूर विमानतळ येथील संरक्षण भिंतीला भगदाड पाडून व भिंतीवरील लावलेली तार तोडून विमानतळ परिसरात बेकायदेशीर प्रवेश करून सार्वजनिक संपत्तीची हानी केलेली आहे. अशा आशयाची फिर्याद संतराम व्यंकटेश ऐनोरे (वय-३६,रा.हत्तुरे वस्ती) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पाच ते सहा अनोळखी इस्मानविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना २३ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या दरम्यान विमानतळ वॉच टाऊन नंबर तीन नई जिंदगी भागाकडील आपत्कालीन गेट नंबर एक येथे घडली. पुढील तपास पोलीस हवालदार शिंदे हे करीत आहेत.

### साडी सेंटर मधून रक्कमसह दागिने लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) बेगम पेठ येथील खंडवा साडी सेंटर येथे फिर्यादी व फिर्यादी यांची बहीण मिळून साड्या खरेदी करण्यासाठी गेल्या होत्या.त्यावेळी दुकानात साड्या खरेदी करण्यासाठी आलेल्या ग्राहकांचा गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांच्या काळ्या पर्समध्ये असलेली रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकूण ४७ हजार ३०० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची फिर्याद तौसिफ एजाज शेख (वय-२४,रा.गैबीपीर नगर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार चुंगे हे करीत आहेत.

# प्रवीण मानेंच्या उमेदवारीमुळे आजी माजी आमदारांच्या पायाखालची वाळू सरकली

## बाबीर बुवाच्या गुलालाची शप्पथ आता काहीही झालं तरी माघार नाही : प्रविण माने

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी :अतुल सोनकांबळे : तुमच्या पाठींब्या मुळे मी आज विधानसभेला अर्ज भरत आहे. व काहीही झालं तरी मी दाखल केलेला अर्ज काढणार नाही. असं म्हणत प्रवीण माने यांनी अपक्ष निवडणूक लढविण्याचा निर्धार केला असुन आता माघार नाही असेही प्रविण माने म्हणाले

आजवर तुम्ही हर्षवर्धन पाटील आणि दत्तात्रय भरणे यांना संधी दिली आहे. मला एकदा पाच वर्ष संधी देऊन बघा, तुमचा सेवक म्हणून मी काम करेल आस बोलताना प्रविण माने यांना अश्रु अनावर झाले.

शाहू-फुले आंबेडकर यांच्या विचाराचा तालुका आपण निर्माण करून दाखवू. इंदापूर तालुक्याचा १९९५ सालचा इतिहास पाहा. इंदापूर तालुक्याचा इतिहास आहे, जेव्हा तिरंगी लढत होते. तेव्हा जो उमेदवार अपक्ष उभा राहतो, तेव्हा तो इंदापूर तालुक्यातून निवडून येतो हा इतिहास आहे. लोकांनी सांगितलं आहे आता जर माघारी घेतली तर तुमचा नंबर मोबाईल मधुन डिलीट करून टाकू.

आपल्या सर्वांच्या साक्षीने आणि आशीर्वादाने थोड्या वेळात उमेदवारी अर्ज भरणार आहे. परिवर्तनाच्या लढाईत समोर बसलेला प्रत्येक माणूस आमदार आहे, हे लक्षात ठेवा. मी एकटा आमदार होणार नाही. आज सकाळी बाबीर बुवाला नारळ फोडून नतमस्तक झालो. बाबीर बुवाचा गुलाल घेऊन आलोय. या गुलालाची शप्पथ घेऊन सांगतो, की तुमच्या पाठींब्या मुळे मी आज विधानसभेला अर्ज भरत आहे. त्यामुळे काहीही झालं तरी मी दाखल केलेला अर्ज काढणार नाही. असं म्हणत प्रवीण माने यांनी अपक्ष निवडणूक लढविण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे इंदापूर विधानसभा मतदारसंघात आता तिरंगी लढत होण्याची शक्यता जवळ जवळ निश्चित झाले आहे.

**भविष्यात आपण साखर कारखाना काढून सर्वांना न्याय देऊ : प्रवीण माने**

मी जर उमेदवारी अर्ज माघारी घेतला तर सगळ्यांचा अपमान आहे. तरंगवाडी तलावापर्यंत पाणी आले पाहिजे. इंदापूर तालुक्यातील सर्व शेटफळ गडे पासून ते तरंगवाडी परीसरात तील सर्व शेततळी भरली पाहिजेत. निरा डाव्या कालव्याचा पाणी प्रश्न सुटला पाहिजे. बावीस गावचा पाणी प्रश्न सुटला पाहिजे, तो सोडवण्यासाठी आपण प्रयत्न करु. शासनाचा निधी नसतो, नागरिकांनी भरलेल्या करातून तो निधी जमा होत असतो. तो योग्य खर्च झाला पाहिजे. इतर कारखान्याच्या तुलनेने कारखान्यांनी ऊसाला दर दिला पाहिजे, अशी सामान्यांची मागणी आहे. त्यामुळे १५ दिवसात ऊसाची बिले मिळायला हवी आहेत. भविष्यात आपण साखर कारखाना काढू आणि सर्वांना न्याय देऊ. असा विश्वासही प्रवीण माने यांनी यावेळी बोलून दाखवला.

**दारात जाऊ, पाया पडू जनतेने जर आशीर्वाद दिला तर सेवक म्हणून काम करू**

सोनाई २००२ ला काढली. आज घरोघरी गाय आहे. साडेसात हजार कामगार आज काम करतात. आपण न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मला पाठींबा द्या, तुमच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, सत्तेपासून बाजूला होईल. हे अभिवचन देतो. कोणी दुधाच्या अनुदानाचा विषय काढला तर त्याला उत्तर द्या. कारण अनुदान सरकारचं आहे. दुध संघ चालकांचे नाही. माझे वडील नेहमी म्हणायचे देवाच्या आशीर्वादाने आपलं खूप चांगले आहे. पण बेटा तू माणसं कमव. जेव्हा संकटं आली तेव्हा हीच जनता धावून आली. सोनाई साठी हीच जनता रस्त्यावर बसली होती. निवडणुका येतील जातील कोण कोणाची मन दुखवू नका.

दारात जाऊ, पाया पडू जनतेने जर आशीर्वाद दिला तर आपण सेवक म्हणून काम करू. जनतेने जर निवडणूक हातात घेतली तर काय होतं हे लोकसभेला पाहिले आहे.

लोकांना मत मागू, पण आपल्या मेरिट वर मागू. टीका करून मिळवलेली दहा मते आपल्याला नको, आपण पाया पडून २० मते मिळवू. पुढे एक पक्ष साहेबांचा, एक पक्ष अजित दादांचा आहे. त्यांच्याकडे बलाढ्य शक्ती आहे.

४० वर्षाचा अनुभव आहे, कार्यकर्ते आहेत, संघटना आहे, अधिकारी वर्ग आहे. ते ठरवलं तर काहीही करू शकतात. आपल्याकडे समोर बसलेली सामान्य जनता आहे. मात्र आपण संघर्ष करू असेही प्रवीण माने म्हणाले.





## करमाळा विधानसभेसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार डॉक्टर शिंदे यांनी भरला उमेदवारी अर्ज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : करमाळा विधानसभेसाठी मराठा योद्धा मनोज जंगी पाटील यांच्या आदेशानुसार करमळ विधानसभेसाठी उमेदवारी अर्ज भरला आहे अशी माहिती मराठा सेवा संघाची माजी तालुकाध्यक्ष डॉक्टर सुनील शिंदे यांनी सांगितले आहे.




गेले अनेक वर्ष मराठा सेवा संघाच्या मार्फत करमाळा तालुक्यातील महाराष्ट्रात विविध सामाजिक सहकार्य सामाजिक बांधवांसाठी कोणतेही यापूर्वी यासाठी रोज आंदोलने तालुक्यासह महाराष्ट्रात केलेली आहे याबाबत वारंवार संबंधित अधिकारी कर्मचारी यांच्यासोबत आमचे वादविवाद झाले आहेत त्यामुळे मराठा योद्धा मनोज जरांगे यांच्या आदेशानुसार उमेदवारी अर्ज भरला आहे प्राध्यापक रामदास झोळ. शंभूराजे जगताप, सुनील सावंत आदींनी अंतरवाली सराटी येथे उमेदवारासाठी मागणी उपस्थित दाखवली होती परंतु समाजासाठी मी जे केलेले आतापर्यंतचे काम याची दखल घेऊन जणांनी पाटील हे मलाच उमेदवारी देतील अशी खात्री डॉक्टर सुजित शिंदे यांनी व्यक्त केली आहे.

## सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघासाठी ४९ व्यक्तींनी ९३ नामांकन अर्ज घेतले

**दैनिक यश सिध्दी न्युज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी / राहुल साबळे : मा. केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ करिता निवडणूक कार्यक्रम घोषित केलेला असून दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. सदर निवडणुकीच्या अनुषंगाने दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ पासून नामांकन अर्ज तहसील कार्यालय येथे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

निवडणूक उमेदवारांचे अर्ज हे मा. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या तहसील कार्यालय येथील दालनामध्ये अर्ज स्वीकृती होणार आहे. अर्ज स्वीकृती साठी उमेदवारा सोबत फक्त ५ व्यक्तींनाच प्रवेश दिला जाणार आहे, आज दि. २४ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत २४- सिंदखेडराजा मतदारसंघांसाठी ४९ व्यक्तींनी एकूण ९३ नामांकन अर्ज घेतले आहेत.

### दोन अपक्ष उमेदवारांचे उमेदवारी अर्ज दाखल

तसेच आज दोन व्यक्तींनी अपक्ष म्हणून नामांकन अर्ज भरले आहेत, पहिला अर्ज श्री.सय्यद मुबीन सय्यद नईम यांनी भरला तर दुसरा अर्ज हा श्री .रामदास मानसिंग कहाळे यांनी भरला आहे.

## कै. बाळासाहेब जिरगे प्रतिष्ठान वतीने दिवाळी फराळ वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : आपुलकीचं नातं आणि सामाजिक बांधिलकी जपत कै बाळासाहेब जिरगे प्रतिष्ठान मित्र परिवाराच्या वतीने दिवाळी फराळ वाटपाचा कार्यक्रम पार पडला.




सोलापूर भाजयुमो सदस्य इरय्या स्वामी यांच्या शुभहस्ते फराळाचे वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना ते म्हणाले की समाजातल्या शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहचवण्याचं काम कै बाळासाहेब जिरगे प्रतिष्ठान करताहेत याचा मला सार्थ अभिमान आहे. लोकोपयोगी आणि लोककल्याणकारी कामाचा एक चांगला पायंडा कै बाळासाहेब जिरगे प्रतिष्ठान मित्र परिवाराने पाडला असून हे काम अत्यंत प्रशंसनिय आहे.

यावेळी ओम जिरगे आपल्या प्रास्ताविक भाषणात म्हणाले की दिवाळी म्हणजे आनंदाचा सण आणि दुसरयाला देण्यातच खरा आनंद आहे. केवळ स्वत: प्रकाशमान व्हायचे नाही तर स्वत: बरोबर इतरांनाही प्रकाशमान करण्याचा पर्व म्हणजेच दिवाळी आणि याप्रमाणेच दुसरयांना प्रकाशमान करण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे.

मुकबंधीर शाळा अक्कलकोट याठिकाणी दिवाळी फराळाचं वाटप करण्यात आलं. यावेळी सोलापूर भाजयुमो सदस्य इरय्या स्वामी, ओम जिरगे, श्रीकांत व्हनखरचे, प्रज्वल पोतदार, विशाल जोगदे आदी शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४**


**के. पी. जयकर, मीना तेजराम श्रीमनलाल व बी. ज्योती किरण या तीन केंद्रीय राजस्व सेवेतील अधिकाऱ्यांची नियुक्ती**

# जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडून विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने प्रशासनाने केलेल्या तयारीची यात आली माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्हास्तरीय समित्यांचे नोडल अधिकारी, जिल्ह्याच्या सर्व ११ विधानसभा मतदारसंघातील निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तसेच राजकीय पक्ष व उमेदवाराच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी नियुक्त केलेल्या सर्व अधिकारी कर्मचारी यांनी त्यांच्यावर सोपवण्यात आलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी. निवडणुकीच्या अनुषंगाने प्रत्येक राजकीय पक्ष व उमेदवाराच्या खर्चाच्या प्रत्येक बाबीवर अत्यंत बारकाईने लक्ष ठेवून तो खर्च संबंधित उमेदवाराच्या खर्च नोंदवहीत नोंदवला गेला पाहिजे याची दक्षता घ्यावी, असे निर्देश निवडणूक खर्च निरीक्षक के. पी. जयकर, मीना तेजराम श्रीमनलाल व बी. ज्योती किरण यांनी दिले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय नोडल अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या आढावा बैठकीत सर्व निवडणूक खर्च निरीक्षक मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पोलीस शहर उपायुक्त दिपाली काळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्यासह सर्व नोडल अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते.




निवडणूक खर्च निरीक्षक श्री. जयकर पुढे म्हणाले की, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सर्व नूडल अधिकारी सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी उमेदवाराच्या खर्चाच्या बाबीवर नियंत्रणासाठी सर्व आवश्यक कार्यवाही केलेली आहे. जिल्हास्तरीय खर्च समिती तसेच प्रत्येक विधानसभा मतदारसंघात खर्च समितीची स्थापना झालेली असून त्यांना प्रशिक्षण ही देण्यात आलेले आहे. एस. एस. टी., व्हीएसटी, फ्लाईंग स्कॉड या टीमसह एमसीएमसी समितीची स्थापना झालेली असून या सर्व टीम अत्यंत बारकाईने निवडणूक खर्चावर नियंत्रण ठेवून तो खर्च उमेदवाराच्या खर्च नोंदवहीत नोंदवला जाईल याची काळजी घेतील. त्याप्रमाणेच जिल्ह्यातील सर्व बँकांनी बँका बरोबरच मोबाईल प्लिकेशन मधील यूपीआय अन्य ऑनलाईन पेमेंट सिस्टीम द्वारा होणाऱ्या प्रत्येक पेमेंटवर, ट्रांजेक्शनवर लक्ष ठेवावे, त्यातील संशयास्पद व्यवहारांची माहिती तात्काळ निवडणूक विभागाला द्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

सर्व निवडणूक यंत्रणांनी निवडणूक कालावधीत लहान लहान बाबीवर लक्ष ठेवावे. राजकीय पक्ष व उमेदवार यांच्याकडून उमेदवारांना आमिष म्हणून साड्या व अन्य लहान लहान इलेक्ट्रॉनिक वस्तू भेट म्हणून देण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी अशा बाबीवर पोलीस यंत्रणेसह सर्व निवडणूक खर्च पथकांनी काळजीपूर्वक काम करावे. व ही निवडणूक प्रक्रिया अत्यंत शांततापूर्ण वातावरणात होण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन निवडणूक खर्च निरीक्षक श्रीमती बी. ज्योती किरण यांनी केले.

मागील दोन दिवसापासून सोलापूर शहर उत्तर सोलापूर शहर मध्य सोलापूर शहर दक्षिण व अक्कलकोट या चार विधानसभा मतदारसंघात विविध ठिकाणी भेटी देऊन निवडणूक कामकाजाची माहिती घेतली. तसेच निवडणूक यंत्रणेने केलेल्या तयारीचा आढावा घेतला असून निवडणूक प्रशासनाने तयारी चांगली केली असून सर्व नियुक्त केलेल्या पथकातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी असे निर्देश निवडणूक खर्च निरीक्षक मीना तेजराम श्रीमनलाल यांनी दिले.

प्रारंभी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अनुषंगाने जिल्हा निवडणूक प्रशासनाने जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात जिल्हास्तरीय विविध समित्यांचे नोडल अधिकारी तसेच विधानसभा निहाय निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केलेल्या तयारीची माहिती दिली. तसेच जिल्हा निवडणूक प्रशासन निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे राबवण्यासाठी पूर्णपणे सज्ज असून उमेदवाराच्या निवडणूक खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध समित्या तसेच पथकांची निर्मिती करण्यात आलेली आहे, अशी माहिती देऊन सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाचे प्रशिक्षणही देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

शहर पोलीस आयुक्त एम राजकुमार व पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सोलापूर शहर व जिल्ह्याच्या ग्रामीण भागात कायदा व व्यवस्था चोख ठेवण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. तर जिल्हास्तरीय खर्च समितीच्या नोडल अधिकारी श्रीमती मीनाक्षी वाकडे यांनी खर्चाच्या प्रत्येक बाबीवर जिल्हास्तरीय समिती तसेच विधानसभा निहाय नियुक्त केलेल्या खर्च समितीच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे प्रशिक्षण देण्यात आल्याचे सांगितले. यावेळी निवडणूक खर्च निरीक्षक यांनी सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, उत्पादन शुल्क कार्यालय, वस्तू व सेवा कर कार्यालय, आयकर विभाग तसेच जिल्हास्तरीय माध्यम व प्रमाणीकरण समिती व जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक तसेच सर्व बँकर्स यांनी केलेल्या निवडणूक तयारीची माहिती घेऊन त्यांना मार्गदर्शक सूचना दिल्या.

जिल्ह्यात ११ विधानसभा मतदारसंघासाठी तीन निवडणूक खर्च निरीक्षक यांची नियुक्ती....

**श्री. के. पी. जयकर –** श्री. के. पी. जयकर हे केंद्रीय राजस्व सेवेतील अधिकारी असून भारत निवडणूक आयोगाने त्यांची नियुक्ती निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून सोलापूर जिल्ह्यात केलेली आहे. पंढरपूर, माळशिरस व सांगोला या तीन विधानसभा मतदारसंघासाठी ते निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून काम काज पाहणार आहेत. उपरोक्त तीन विधानसभा मतदारसंघातील निवडणूक खर्चाची संबंधित कोणत्याही प्रकारची तक्रार असेल तर ती तक्रार ९९ ६२ ४५ २५ ० २ या भ्रमणध्वनी क्रमांकावर करावी असे आवाहन त्यांनी केले आहे.

**श्रीमती बी. ज्योती किरण –** ह्या केंद्रीय राजस्व सेवेतील अधिकारी असून भारत निवडणूक आयोगाने त्यांची नियुक्ती निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून सोलापूर जिल्ह्यात केलेली आहे. करमाळा, माढा, बार्शी व मोहोळ या चार विधानसभा मतदारसंघासाठी त्या निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून कामकाज पाहणार आहेत. उपरोक्त चार विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना निवडणूक खर्चाशी संबंधित कोणत्याही प्रकारची तक्रार असेल तर ९४ २५ ०१०५०० या भ्रमणध्वनी क्रमांकावर करावी असे आवाहन करण्यात येत आहे.

**श्री. मीना तेजराम श्रीमनलाल –** हे केंद्रीय राजस्व सेवेतील अधिकारी असून भारत निवडणूक आयोगाने त्यांची नियुक्ती निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून सोलापूर जिल्ह्यात केलेली आहे. सोलापूर शहर उत्तर, सोलापूर शहर मध्य, अक्कलकोट व सोलापूर शहर दक्षिण या चार विधानसभा मतदारसंघासाठी ते निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून कामकाज पाहणार आहेत.उपरोक्त चार विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना निवडणूक खर्चाशी संबंधित कोणत्याही प्रकारची तक्रार असेल तर ९११५२५२५९४ या भ्रमणध्वनी क्रमांकावर करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.